**डॉ.गौतम शाह धुळ्यात उपलब्ध**
गुडघे दुखी, कंबरदुखी, स्लीप डिस्क, संधीवात, सायटीका या रुग्णांवर ओझोन थेरपी व गुडघ्याची इंजेक्शन थेरपीने यशस्वी उपचार
**दि.७ सप्टेंबर ते १२ सप्टेंबर २०२६ या कालावधीत धुळे येथे उपलब्ध असणार आहेत. स.१० ते २ दु.**
संपर्क :- **डॉ.गौतम शाह M.S.** (ऑर्थो) शाह क्लिनिक
श्री.विठ्ठल हॉस्पीटल, जुने आस्था हॉस्पीटल, रामवाडीसमोर, मालेगावरोड, धुळे (फोन नं.०२५६२-२३५११३)
भ्रमणध्वनी-०८६००३५१०००/९८८१२७८६९८

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३३३ ■ शनिवार ५ सप्टेंबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.No./DHL/53/24-26

**PREMIUM QUALITY FOOD IN DHULE**
* Dosas * Sandwiches * Pav Bhaji * Pulao * Frankie * Pizza * Fries * Chopsuey / Noodles * Momos * Soup * Punjabi / Chinese / Continental * Starters * Sizzler * Tandoor Starters * Chaap * Thali Main Course * Juices * Falooda / Milkshakes / Dessert
JAIN FOOD AVAILABLE FREE HOME DELIVERY
SPACE FOR KITTY / BIRTHDAY PARTY
B'Live® Delightful delicacies!
**B'Live Restaurant**
Below Card House, Lane No.5, Near Sonya Maruti, Dhule
9423928900 / 9307868768
Also available on zomato SWIGGY

## पेपरफुटी विरोधात अमरावतीत विद्यार्थ्यांचा एल्गार हजारोंचा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा

**अमरावती, दि.४- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) औषध निरीक्षक पदभरती परीक्षेतील पेपरफुटीच्या प्रकरणामुळे अमरावतीत हजारो विद्यार्थ्यांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले. पेपरफुटीची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी आणि आगामी स्पर्धा परीक्षा पारदर्शक पद्धतीने घेण्यात याव्यात, या मागण्यांसाठी विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढला.**

अमरावती शहरातील पंचवटी चौकातून या मोर्चाला सुरुवात झाली. गाडगे महाराज समाधी मंदिर परिसरात मोठ्या संख्येने स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी एकत्र आले. तेथून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत विद्यार्थ्यांनी मोर्चा काढत एमपीएससी आणि राज्य सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

पेपरफुटीच्या घटनांमुळे मेहनत घेऊन स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला असल्याचा संताप आंदोलक विद्यार्थ्यांनी व्यक्त केला. परीक्षेतील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना कराव्यात, तसेच दोषींवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

आयोगाच्या कारभारावर रोष एमपीएससीच्या परीक्षांमध्ये वारंवार पेपरफुटीच्या घटना समोर येत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. या परिक्षेतून निवड होणारे प्रशासनात येतात आणि प्रशासन हे संवैधानिक असले पाहिजे. त्यामुळे या परीक्षा आणि निवड प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शी होणे आवश्यक आहे. परीक्षा प्रक्रिया अधिक सुरक्षित आणि पारदर्शक करण्यासाठी ठोस पावले उचलण्याची मागणी विद्यार्थ्यांकडून करण्यात येत आहे. आयोगाचे अध्यक्ष आणि सचिव यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारावी, अशी मागणीही आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर होत आहे. दरम्यान, मोर्चाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. विद्यार्थ्यांच्या मोठ्या संख्येमुळे शहरातील काही मार्गांवर वाहतूक कोंडीची परिस्थिती निर्माण झाली. औषध निरीक्षक पदभरती परीक्षेचा पेपर फुटल्याचे स्पष्ट झाल्यानंतर राज्यातील विविध शहरांमध्ये विद्यार्थ्यांकडून आंदोलन करण्यात येत आहे.

## निशूच्या वडिलांवर हल्ला स्वतंत्र भारद्वाज अटकेत

नवी दिल्ली, दि.४- सीजेपीच्या आंदोलनातील कार्यकर्ती निशू आझाद हिचे वडील संजयकुमार यांच्यावर २० जुलै रोजी झालेल्या हल्ल्याप्रकरणी स्वतंत्र भारद्वाज याला दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. दिल्ली पोलिसांनी आज (दि. ४) उत्तर प्रदेशातील बुलंदशहर येथून भारद्वाजला ताब्यात घेतले. त्याला स्थानिक पोलीस ठाण्यात नेऊन चौकशी करण्यात येत आहे. या प्रकरणाला गुरुवारी वेग आला. निशू आझाद हिने व्हिडिओ पोस्ट करून काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याकडे न्यायाची मागणी केली होती. त्यानंतर राहुल गांधी यांनीही तिच्या पोस्टला उत्तर देत तिच्यासोबत असल्याचे म्हटले होते.स्वतंत्र भारद्वाज याने एका पॉडकास्टमध्ये संजयकुमार यांच्यावरील हल्ल्याचा उल्लेख केल्याचा दावा (पान ४ वर)

## अंमली पदार्थांना धुळ्यात थारा नाही; ड्रग-फ्री धुळे हेच सामूहिक उद्दिष्ट : ना.रावलांचे प्रतिपादन

**धुळे, दि.४- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नशामुक्त व सक्षम युवा पिढीच्या संकल्पनेला बळ देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली धुळे जिल्ह्यात झिरो टॉलरन्स फॉर ड्रग्स धोरण प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यात अमली पदार्थांना कोणत्याही स्वरूपात थारा न देता पुढील १०० दिवसांत गतिमान आणि परिणामकारक मोहीम राबवावी. आगामी काळात आमचा धुळे जिल्हा ड्रग-फ्री आहे असे आत्मविश्वासाने सांगता येईल, अशी परिस्थिती निर्माण करणे हे सर्व यंत्रणांचे सामूहिक उद्दिष्ट असावे, असे निर्देश राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी दिले.**




जिल्हाधिकारी कार्यालयात ड्रग-फ्री धुळे जिल्हा अभियानाच्या अनुषंगाने आयोजित उच्चस्तरीय आढावा बैठकीत पालकमंत्री श्री. रावल बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, धुळे महानगरपालिकेचे आयुक्त नितीन कापडणीस, जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे पोलीस अधिकारी तसेच विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते. पालकमंत्री श्री. रावल म्हणाले की, विकसित भारताच्या उभारणीत युवा शक्तीला महत्त्वाचे स्थान असून, ही पिढी निरोगी, सक्षम आणि व्यसनमुक्त ठेवणे ही शासन, प्रशासन, कुटुंब आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या (पान ४ वर)

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

## सटीपाणी येथे गांजाची शेती उध्वस्त अठरा लाखांचा गांजा केला हस्तगत

**नंदुरबार, दि.४ (प्रतिनिधी)- आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर अवैध दारूची वाहतूक व साठा, अवैध अग्निशस्त्रे तसेच अंमली पदार्थांची लागवड व विक्रीविरोधात कारवाई करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक अश्विनी सानप यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेने शहादा तालुक्यातील सटीपाणी शिवारात कारवाई करत ३९ किलो ४ ग्रॅम वजनाची गांजाची झाडे जप्त केली. या गांजाची किंमत १८ लाख १९ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.**

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना ३ सप्टेंबर रोजी गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, शहादा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मलगाव ते सटीपाणी शिवारातील मालनदेवी नाल्याजवळ एका भुईमूगाच्या शेतात एका इसमाने आर्थिक फायद्यासाठी गांजाची बेकायदेशीर लागवड केली आहे.

माहिती मिळताच निरीक्षक हेमंत पाटील यांनी पथक तयार करून कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार पथकाने मालनदेवी नाल्याजवळील भुईमूगाच्या शेताची पाहणी केली. यावेळी भुईमूगाच्या पिकामध्ये गांजाची झाडे लावण्यात आल्याचे आढळून आले. पोलिसांनी ही झाडे ताब्यात घेतली असून त्यांचे एकूण वजन ३९ किलो ४ ग्रॅम असल्याचे समोर आले. या प्रकरणी ठाणसिंग हुंड्या ऊर्फ दुंड्या पावरा (रा. जामजिरा जालोद, पोस्ट तऱ्हाड कसबे, ता. शिरपूर, जि. धुळे) याच्याविरुद्ध शहादा पोलीस ठाण्यात गुंगीकारक औषधी द्रव्य व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम, १९८५ मधील कलम ८(सी) व २०(ए) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अश्विनी सानप, (पान ४ वर)

## ऋतूजा पाटीलने केला मोबाईलचा पुरावा गायब न्यायालयाने सुनावली ५ सप्टेंबरपर्यंत पो.कोठडी

**नंदुरबार, दि.४ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या औषध निरीक्षक पेपर फूटीप्रकरणी ऋतूजा पाटील हिला पहिल्यादांच मुंबई सेशन कोर्टात हजर करण्यात आले. तिच्याकडून महत्वाचा मोबाईल हस्तगत.करता न आल्याने तिला पाच सप्टेंबर पर्यंत पोलिस कोठडी ठोठावण्यात आली आहे. ऋतूजा हिच्या मोबाईल चॅटमुळेच पेपर फुटीचे प्रकरण उघडकीस आले.ऋतूजा हि पोलिसांना फारसी सहकार्य करीत नसल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.**

ऋतूजा पाटील हिच्यासह लोकेश उर्फ गौरव पाटील,प्रविण पाटील,गोपाळ मराठे,अमृत पाटील,अवर सचिव अभिजित लेंडवे, विश्वेश्वर नकाते आदींना कोर्टात हजर करण्यात आले होते. आता पर्यंत या प्रकरणी सात जणांना अटक करण्यात आली आहे.सात पैकी पाच आरोपी नंदुरबारचे आहेत. अधिकाऱ्यांकडून ही पेपर फुटी करण्यात आली,ती प्रविण पाटील पर्यंत पोहचविण्यात आली.प्रविण पाटील याने अमृत पाटील याला पेपर पाठवला,तसेच अमृत पाटीलने ऋतूजाला पेपर दिला,त्यानंतर व्हाटसप चॅटव्दारे हे प्रकरण बाहेर आले. लोकेश उर्फ गोपाळ हाही या प्रकरणातील आरोपी आहे. नकाते या अधिकाऱ्याने खाडीत लॅपटॉप फेकला होता. पुरावा नष्ट.करण्याचा प्रयतक. विफल ठरला.पोलिसांनी हा लॅपटॉप रिकव्हर केला.परतू ऋतूजा पाटील हिने चॅट केलेला मोबाईलच गायब केला आहे. पोलिसांनी तिच्या चौकशीसाठी पोलिस कोठडीची मागणी केली होती.तिला पाच सप्टेंबर पर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. एक सप्टेंबर रोजी तिला अटक करण्यात आली होती.तिला आज पहिल्यांदाच कोर्टात हजर करण्यात आले.लहान वयाची ऋतूजा कोर्टात रडल्याची माहिती समोर आली आहे. राज्यात रॅकमध्ये सातव्या स्थानावर आलेली ऋतूजा व्हाटसप चॅटमुळे आरोपीच्या कठडीत पाहायला मिळाली आहे. प्रविण पाटील किती दिवसापासून पेपर फोडत होता, मुळचा नंदुरबारचा असलेला (पान ४ वर)

### पोलिसांना चोरट्यांचे खुले आव्हान

## निवेदनानंतर चोवीस तासांत सतरा मेंढ्या लंपास; देवभानेतील घटना

**सोनगीर दि. ४( प्रतिनिधी)- आमच्या शेळ्या-मेंढ्यांचे रक्षण करा, चोरीच्या घटनांचा उकल करून न्याय द्या! अशी आर्त हाक मेंढपाळांनी पोलीस दरबारी निवेदनाद्वारे दिली. या घटनेला अवघे काही तास उलटत नाहीत, तोच अज्ञात चोरांनी देवभाने शिवारात एका मेंढपाळाच्या वाड्यावरून सुमारे १७ मेंढ्या लंपास करत पोलीस प्रशासनाला जणू खुले आव्हानच दिले आहे.**



धुळे तालुक्यातील सोनगीर पोलीस स्टेशन आणि शिंदखेडा तालुक्यातील नरडाणा पोलीस ठाण्याच्या हद्दीत शेळ्या-मेंढ्या चोरीला जाण्याचे सत्र सातत्याने सुरू आहे. गेल्या काही महिन्यांपासून सुरू (पान ४ वर)

## देऊर-म्हसदी मार्गावर बसला ट्रकची धडक तीस विद्यार्थी जखमी; पोलिसांकडून मदतीचा हात

**धुळे, दि.४- धुळे आगाराची मानव विकास योजनेंतर्गत धावणारी एसटी बस आणि मालवाहू ट्रक यांच्यात समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात बसमधील सुमारे विद्यार्थी जखमी झाले. सुदैवाने जीवितहानी झाली नाही. हा अपघात शुक्रवारी ४ सप्टेंबर रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास देऊर ते म्हसदी गावाच्या दरम्यान घडला. जखमी विद्यार्थ्यांना नेर दूरक्षेत्र पोलिसांच्या मदतीने साक्री ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.**



धुळे आगाराची एमएच ०६ एस ८५८९ क्रमांकाची बस पिंपरखेड ते म्हसदी या मार्गावर मानव विकास बस शालेय फेरी म्हणून धावत होती. बसमध्ये सुमारे ४५ प्रवासी होते. सकाळी ७.४५ वाजण्याच्या सुमारास देऊर ते म्हसदी गावादरम्यान वळणावर बस आली असता समोरून येणाऱ्या एमएच १८/एए- ५८८८ क्रमांकाच्या टाटा मालवाहू ट्रकला बसची समोरासमोर धडक झाली. रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष झाल्याने हा (पान ४ वर)

## आदर्श शिक्षक पुरस्कार जि.तील तिघांची निवड

धुळे, दि.४- जिल्हा परिषद शिक्षण विभाग प्राथमिक मार्फत जिल्ह्यातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या जि.प.शाळेतील शिक्षकांना दि.५ सप्टेंबर रोजी आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.या पुरस्कारासाठी शिंदखेडा, साक्री व शिरपूर येथील दोन शिक्षक एका शिक्षिकेची निवड करण्यात आली आहे. अशी माहिती शिक्षणाधिकारी वैभव बाचकर यांनी दिली आहे. जिल्हा आदर्श शिक्षक निवड समितीने दि.२० ऑगस्ट २०२६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार यांच्या अध्यक्षतेखाली पुरस्कारासाठी प्रस्ताव आलेल्या दहा शिक्षकांच्या (पान ४ वर)

## एस.टी.चालकास दगड मारून गंभीर जखमी केले आरोपीला सहा महिने सश्रम कारावासाची शिक्षा

**नंदुरबार, दि.४(प्रतिनिधी)- एस.टी. बस चालकास दगड मारून जखमी केल्याप्रकरणी आरोपीला नंदुरबार येथील मा. मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने ६ महिन्यांचा सश्रम कारावास व १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. तसेच दंडाच्या रकमेतून ८ हजार रुपये फिर्यादी एस.टी. चालकास नुकसानभरपाई म्हणून देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.**

ही घटना १९ जुलै २०२५ रोजी खोलघर ते केवडीपाडा दरम्यान घडली होती. नंदुरबार बस आगारातील चालक देवा नामदेव गावीत (वय ५२, रा. अजेपूर, ता. जि. नंदुरबार) हे नंदुरबार ते खोलघर एस.टी. बस घेऊन गेले होते. खोलघर येथून नंदुरबारकडे परत येत असताना केवडीपाड्याजवळ एक इसम बसच्या मागील शिडीवर चढल्याचे चालकाच्या निदर्शनास आले. चालकाने बस थांबवून त्याला बसमध्ये घेतले.

बस पुढे निघाल्यानंतर सदर इसमाने बसमधील एका महिलेला मारहाण करण्यास सुरुवात केली. चालक व वाहकाने त्याला अडवून जाब विचारला असता, संबंधित महिला आपली पतनी असल्याचे त्याने सांगितले. त्याचे नाव मंगू सजन जगताप (रा. खोलघर, ता. नवापूर, जि. नंदुरबार) असल्याचे समोर आले. इतर प्रवाशांसोबत पुन्हा अशी घटना घडू नये म्हणून चालक व वाहकाने मंगू जगताप याला बसमधून खाली उतरविले. याचा राग आल्याने त्याने हातातील दगडाने चालक देवा गावीत यांच्या चेहऱ्याच्या डाव्या बाजूस मारून त्यांना जखमी केले. तसेच धमकी दिली. घटनेची माहिती मिळताच नंदुरबार तालुका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आरोपी मंगू (पान ४ वर)

## वाहने नेणारा कंटेनर पुलावरून कोसळला

धुळे, दि.४- शहरातील मुंबई आग्रा महामार्ग वडजाई रोड उड्डाणपुलावरून चारचाकी वाहने नेणारा कंटेनर पुलावरून थेट खाली कोसळला. चालक जखमी झाला असून त्याला रुग्णालयात दाखल केले, अपघातात कंटेनरचे नुकसान झाले असून सुदैवाने मोठी दुर्घटना टळली.नवीन चारचाकी वाहने घेऊन निघालेला कंटेनर क्र.एन एल ०१/क्यु-३८९३ उत्तर प्रदेश येथून आज दुपारी शहरातून जात होता. बंगळूरकडे (कर्नाटक) वाहने नेण्याचे नियोजन होते. शहरातील वडजाई रोड उड्डाणपुलावर पुलाचे कठडे तोडून उड्डाणपूल खाली कोसळला. त्यात चालकाला दुखापत झाली.त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## वणी, मोघणच्या ट्रान्सफार्मर दुरुस्ती मा.आमदार कुणाल पाटलांची सुचना

**धुळे, दि.४- वणी आणि मोघण येथे कृषी पंपांना वीज पुरवठा करणारा ट्रान्सफार्मर गेल्या दोन ते तीन महिन्यापासून बंद होता. सदर ट्रान्सफार्मर मा.आ.कुणाल पाटील यांच्या सूचनेवरुन तत्काळ बसविण्यात आला. त्यामुळे वणी आणि मोघण येथील शेतकऱ्यांचा विजेचा प्रश्न सुटल्याने शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे. दरम्यान दुष्काळाच्या चक्रात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून पिकांना जीवदान मिळाले आहे.**

धुळे तालुक्यातील वणी आणि मोघण येथील कृषी पंपांना वीज पुरवठा करणारा ट्रान्सफार्मर गेल्या दोन ते तीन महिन्यापासून तांत्रिक बिघाडामुळे बंद होता. वीज वितरण विभागाकडे नवीन ट्रान्सफार्मर बसविण्यात यावा यासाठी वारंवार पाठपुरावा शेतकऱ्यांनी करुनही ट्रान्सफार्मर बसविण्यात येत नव्हता त्यामुळे वणी येथील शेतकऱ्यांनी मा.आ.कुणाल पाटील यांच्याकडे सदर ट्रान्सफार्मर दुरुस्त करण्यासाठी वीज वितरण कंपनीला सूचना करावी अशी मागणी मा.आ.कुणाल पाटील यांच्याकडे केली होती. त्यानुसार वणी येथील ट्रान्स्फार्मर क्र.२६७ त्वरीत बसविण्यात आला. त्याचप्रमाणे मोघण शिवारातील पाटचारी क्र.४ वरील ट्रान्स्फार्मर गेल्या तीन महिन्यापासून जळाला होता. अंकुश सोनवणे, दिलीप माळी, युवराज माळी, शशिकांत माळी, गौतम पाटील, दादा माळी, नंदु माळी, भिवसन माळी, भटा नामेस्कर, महेंद्र पाटील, भाऊसाहेब माळी यांनी सामाजिक कार्यकर्ते मधुकर माळी यांची भेट घेतली. कृषी पंपांना वीज पुरवठा करणारा ट्रान्सफार्मर दुरुस्तीबाबतची कैफीयत शेतकऱ्यांनी सामाजिक कार्यकर्ते श्री मधुकर माळी यांच्याकडे मांडली. त्यानुसार श्री माळी यांनी मा.आ.कुणाल पाटील यांच्याशी संपर्क साधुन मोघण येथील ट्रान्सफार्मर दुरुस्तीबाबत मागणी केली. मा.आ.पाटील यांनी तत्काळ दखल घेत वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना सूचना केल्याने मोघण येथील ट्रान्सफार्मर त्वरीत बसविण्यात आला. गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारल्याने शेतकरी दुष्काळाच्या चक्रात सापडले आहेत. शेतात असलेल्या पिकांना वाचविण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरु असून कृषी पंपाव्दारे विहीरीतील पाणी पिंकाना दिले जात आहे. मात्र वणी आणि मोघण येथील ट्रान्सफार्मर दोन ते तीन महिन्यापासून जळाला होता परिणामी शेतकऱ्यांची खरीपातील पिके धोक्यात आली होती.




## सकल मराठा समाजातर्फे प्रतिकात्मक अंत्ययात्रा; कार्यकर्त्यांना अटक व सुटका

**धुळे, दि.४- सकल मराठा समाज, धुळे तर्फे सरकारची प्रतिकात्मकअत्यंयात्रा काढण्यात आली. यावेळी सकल मराठा समाजाच्या नागरीकांचा संताप दिसून आला. यापूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला वेळोवेळी सहकार्य केले. तसेच सरकारने देखील जरांगे पाटील यांना हैद्राबाद गॅझेट लागू करून त्यानुसार आरक्षण देणेबाबत आश्वासन दिले होते. त्यानुसार ५८ लाख कुणबी नोंदी मिळून आल्या. तरीदेखील सरकारने त्याची कुठलिही दखल न घेता आजपर्यंत मराठा समाजाला आरक्षण दिलेले नाही. शासनाच्या निषेधार्थ सकल मराठा समाज धुळेतर्फे प्रतिकात्मक अंत्ययात्रा काढल्याने पोलीसांनी कार्यकर्त्यांना अटक करून सुटका करण्यात आली.**

शासनाने मराठा समाजाला झुलत ठेवले त्यामुळे जरांगे पाटील यांनी पुन्हा उपोषण व आंदोलन सुरु केले असून दि.११/०९/२०२६ पर्यंत सरकारला अल्टिमेट दिलेला आहे. जरांगे पाटील यांनी सुरु केलेल्या उपोषण व आंदोलनाला पाठींबा म्हणून सकल मराठा समाज, धुळे तर्फे सरकारची प्रतिकात्मक अंत्ययात्रा काढून सरकारचा निषेध नोंदविण्यात आला. तसेच (पान ४ वर)

## चाळीत केवळ चाळीस टक्के कांदा नाशिक मध्ये साडेचार हजारांपुढे

**लासलगाव, दि.४- नाशिक जिल्ह्यात कांद्याच्या दराने पुन्हा एकदा साडेचार हजार रुपयांचा टप्पा ओलांडला आहे. चाळींमध्ये साठवलेल्या उन्हाळ कांद्याचा मोठा हिस्सा बाजारात दाखल झाल्याने शिल्लक साठा कमी झाला आहे. त्यातच वातावरणामुळे कांदा खराब होत असल्याने आगामी काळात बाजारातील उपलब्धता आणखी कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील काही आठवडे कांद्याच्या दराच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरण्याची शक्यता आहे. कांद्याच्या दरावर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र सरकारने नाफेड आणि एनसीसीएफच्या माध्यमातून राखीव साठ्यातील कांदा दिल्ली, चेन्नईसह प्रमुख महानगरांमध्ये पाठवला होता. राखीव कांदा ३५ रुपये किलो दराने उपलब्ध करून देण्यात आल्याने मागील सप्ताहात बाजार समित्यांमधील कांद्याच्या घाऊक दरावर दबाव निर्माण झाला. परिणामी कांद्याच्या दरात क्विंटलमागे** (पान ४ वर)



## खासदार डॉ.बच्छाव यांचा मोबाईल हॅक हॅकर्सकडून व्हॉट्सपवरून पैशांची मागणी

**नाशिक (विश्वास मदाने)- काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या आणि धुळे लोकसभा मतदारसंघाच्या खासदार डॉ. शोभा बच्छाव यांचा मोबाईल हॅक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मोबाईल हॅक केल्यानंतर हॅकर्सनी त्यांच्या कॉन्टॅक्ट लिस्ट मधील अनेक व्यक्तींना व्हॉट्सपद्वारे पैशांची मागणी करणारे मेसेज पाठवले. ही घटना काल दि.३ रोजी राहुल गांधींच्या दौऱ्यानंतर घडली.**

मिळालेल्या माहितीनुसार, खासदार डॉ. शोभा बच्छाव ह्या मिटींगमध्ये असल्यामुळे त्यांचा मोबाईल त्यांच्या पीएकडे असताना एका व्यक्तीचा फोन आला. तुमचे कुरिअर आले आहे, मात्र पत्ता सापडत नाही. तुम्हाला एक लिंक पाठवली आहे, ती तपासा, असे फोन करणाऱ्या व्यक्तीने सांगितले. पीएने ती लिंक उघडताच काही वेळातच खासदारांचा मोबाईल हॅक झाला. मोबाईलचा ताबा मिळवल्यानंतर हॅकर्सनी खासदारांच्या नावाने त्यांच्या संपर्कातील लोकांना माझ्या खात्यात हजार रुपये जमा करा, मी दोन तासांत परत करेन तसेच हेल्प मी असे (पान ४ वर)



## जरांगे पाटलांच्या उपोषणाला दोंडाईचा येथे सकल मराठा समाजाचा पाठींबा

**दोंडाईचा दि. ४(प्रतिनिधी)- मराठा समाजाला आरक्षण मिळावे व इतर प्रलंबित मागण्या पूर्ण व्हाव्यात यासाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या उपोषणास दोंडाईचा शहर व परिसरातील सकल मराठा समाजाच्या वतीने पूर्ण पाठिंबा दर्शवण्यात आला आहे. यासंदर्भात दोंडाईचा तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले.**

या निवेदनात म्हटले आहे की,मराठा समाजातील अनेक कुटुंबे आज आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक अडचणींचा सामना करत आहेत. समाजातील विद्यार्थी, युवक व बेरोजगारांना शिक्षण, सरकारी नोकरी तसेच इतर संधींमध्ये योग्य प्रतिनिधित्व मिळणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे शासनाने मराठा समाजाच्या न्याय्य मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.निवेदनाद्वारे मराठा समाजाच्या वतीने पुढील प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या आहेत. मराठा समाजाला कायदेशीर आणि टिकणारे आरक्षण तातडीने लागू करावे. आरक्षणासंदर्भातील प्रलंबित मागण्यांवर शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा. मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण क्षेत्रात आवश्यक त्या सर्व सवलती व सुविधा द्याव्यात. युवकांना रोजगार आणि स्पर्धा परीक्षांसाठी विशेष शासकीय सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. (पान ४ वर)

## बाळापूर येथे स्मार्ट मीटर लावणाऱ्या पथकावर हल्ला; एक कर्मचारी जखमी

**धुळे, दि.३- बाळापुर परिसरात स्मार्ट मीटर बसविण्यास गेलेल्या वीज वितरण कंपनीच्या (महावितरण) पथकावर काही जणांनी हल्ला केला. तर यावेळी एका कर्मचाऱ्याला दुखापतही झाली असून आठ संशयितांविरुद्ध धुळे तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.**

वीज वितरण कंपनीचे पथक बुधवारी (दि.२) सायंकाळी पाचच्या दरम्यान बाळापूर शिवारातील शांतीसागर हॉटेलजवळील साई सागर ग्रेनाईट अँड मार्बल दुकानात ही घटना घडली. संबंधित व्यावसायिक ग्राहकाचे वीजबिल थकीत असल्याने नियमानुसार जुने मीटर काढून स्मार्ट मीटर बसविण्यासाठी वीज कंपनीचे पथक वीजपुरवठा खंडित करण्यासाठी गेले. या पथकात वीज कंपनीचे सहाय्यक अभियंता आशिष अशोक कासार, तंत्रज्ञ रवींद्र देविदास चौधरी, तंत्रज्ञ चंद्रकांत भालेराव पाटील, तंत्रज्ञ रुपेश रवींद्र पाटील यांचा समावेश होता. पथक आल्याचा राग आल्याने सागर पाटील, आकाश पाटील, ज्ञानेश्वर पाटील, योगेश याच्यासह एक अनोळखी व्यक्ती तसेच (पान ४ वर)

**दिपक ज्वेलर्स**
सोने- 22 K -1,39,850 रु.+3% GST
सोने- 24 K -1,52,000 रु.+3% GST
चांदी- 2,35,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

# आपला महाराष्ट्र

## डिजे मुक्त सोलापूर पॅटर्न लागू करण्याची गरज

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाचा उपयोग स्वातंत्र्याच्या आंदोलनात जनजागृती साठी केला होता. त्यात त्यांना भरपूर यश मिळाले.धार्मिक उत्सवांचा सोस आपल्या समाजाला पूर्वी पासूनच असल्याने त्या उत्सवांना सार्वजनिक स्वरूप आले.मात्र असे असले तरी अतिशय संयमाने तसेच विवेकाचा वापर करीत हे उत्सव साजरे होत असत त्यामुळे सर्वांनाच त्यांचा आनंद लुटता येत होता.आता उत्सवांना विकृती स्वरूप आले आहे.गोंगाट,वाद्यांचा दणदणाट, आणि अलीकडील काळात डीजे नावाच्या राक्षसाचे उत्सवातील आगमन तसेच वापर लोकांच्या जीवावर उठलेले आहे.अती उत्साही मंडळी बालक,महिला,ज्येष्ठ नागरिक आजारी व्यक्तींना अजिबात मोजत नाहीत. लोक मृत्युमुखी पडले तरी हरकत नाही पण आम्ही आमच्या भक्तीत कसर ठेवणार नाही. आसा ताठा आयोजकात आणि सहभागीत असतो.बेमुर्वतखोर वागणूक अशीच ज्यांची ओळख आहे त्यांच्या कडून मानवीय भूमिकेची अपेक्षा नाही.श्रींचे आठ पंधरा दिवस आधी आगमन हा एक नवा कार्यक्रम सुरू झालेला आहे.त्याचे मोठमोठे बॅनर लागतात.त्यावर भक्तांच्या फोटोंची मांदियाळी असते.हळूच मिरवणुका निघतात.मोठमोठ्या मूर्ती अती जड्डोपातील मिरवणूक आणि त्यात प्रचंड गलका असलाच पाहिजे अशी योजना तयार केलेली असते.तो लोकांनी मुकाटपणे सहन करायचा.कायदा धाब्यावर ठेवणे हा आपला जन्म सिद्ध हक्कच आहे असे मानणारी मंडळी संख्येने मोठी असल्याने आणि व्यवस्थेचे त्यांना प्रोत्साहन असल्याने नियमबाह्य वागण्याची त्यांना मुभा असते.

मुंबईत तर फार मोठ्या उंचीच्या गणेश मूर्तींच्या आग्रहामुळे आणि मिरवणुकीतील गडबडीमुळे अनर्थ ओढवला.मूर्ती कुंडली आणि आयोजकातील झोपा प्रमुखांच्या अंगावर पडली.त्यात ते ठार झाले.उत्सव अजून सुरू झालेला नसताना एक महिना आधीच आगमनाचा सोहळा साजरा करण्याच्या हव्यासापोटी हे सगळे घडले.जर वेळेवर नेहमीप्रमाणे आगमन साजरे केले असते तर दोघांचे प्राण निश्चितच वाचले असते. परंतु आपली मानसिकता फारच विचित्र आहे.जे गेले ते पुण्यात्मे होते.त्यांना मोक्ष मिळाला अशी आपण आपली समजूत घालत असतो. आणि पुढच्या कामाला लागत असतो.तथापि ज्या ठिकाणी जागरूक समाज असतो,जेथे विवेक जागा असतो त्या ठिकाणी सार्वजनिक उत्सव संयमाने साजरे होतात.त्या संदर्भात सोलापूर शहराचा सर्व शहरातील मंडळांनी आदर्श घ्यावा असे निर्णय सोलापूरच्या सुबुद्ध नागरिकांनी घेतले आणि प्रशासनाला त्यानुसार अंमल बजावणी करण्यास भाग पडले.अशा प्रकारे सोलापूर पॅटर्न तयार झाला.तो सगळीकडे लागू करावा असाच आहे.सोलापूर शहर महाराष्ट्रातील पहिले डिजिटल मुक्त शहर म्हणून ओळखले जाते. ना डिजे ना डॉल्बी शिवाय लेझर साईटवर पूर्णपणे या शहरात बंदी आहे.जनरेट्यामुळे प्रशासनाला तसे आदेश काढावे लागले. जनचळवळ समृध्द आणि शुध्द असेल तर त्याचे परिणाम सकारात्मक कसे होतात त्या संबंधीचे सोलापूर हे मोठे उदाहरण म्हणावे लागेल.

२०२५ च्या विसर्जन मिरवणुकीत लेझर लाईट आणि डिजेवर पूर्णपणे जिल्हाधिकारी तसेच पोलीस प्रमुखांनी बंदी आणली होती. तसे आदेश त्यांनी काढले होते.त्या आदेशाचा परिणाम असा झाला की,सुमारे अकराशेहून अधिक मंडळांनी सार्वजनिक गणेशोत्सवात डिजेच लावले नाहीत.मोजक्या मंडळांनी मिरवणूक काढल्या.बाकीच्या मंडळांनी साधेपणाने विसर्जन केले.त्यामुळे त्यांचा पैसा वाचला.पोलिसांनी आपणहून ही कार्यवाही केली असे नाही तर काहींनी पुढाकार घेत सह्यांची मोहीम राबवली.मोबाईलवरून संपर्क केला.विविध घटकांशी ते बोलले. स्वत्वार आले.आंदोलन उभारले.यात वकील, सामाजिक कार्यकर्ते आणि डॉक्टरांनी सहभाग घेतला.दरवर्षी आठ ते दहा तरूण डिजेमुळे कायमचे बहिरे होतात असे सोदाहरण डॉक्टरांनी लोकांना पटवून दिले.अनेकांच्या कानांचे पडदे डिजेच्या दणदणाटामुळे फाटून जातात,ही बाब पटल्याने ज्येष्ठ नागरिक संघ, डॉक्टरांच्या संघटना,शिक्षक,महिला मंडळे आदी डिजे डॉल्बी बंदीसाठी पुढे आले. खरोखरच डिजेमुळे मुले घाबरतात.मिरवणूक व ज्येष्ठांचा जीव कासावीस होतो.रक्त दाब वाढतो.हृदयाघाताची शक्यता अधिक असते. म्हणून परंपरागत वाद्ये वाजवू या असे आवाहन सोलापूरला करण्यात आले.त्यावर अंमलबजावणी करताना पोलिसांनी आधी आवाज मोजला.उल्लंघन करणारांना दंड ठोकला.पंचनामे केले.केसेस दाखल करून ध्वनिक्षेपक जप्त केले.जनजागृती केली. त्याचा परिणाम असा झाला की, मंदिरे, मशिदी, दर्गे, मदरसे, चर्च, विहारातील व्यवस्थापनांनी स्वतःहून भोंगे काढून घेतले. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सर्वच उत्सवातील धांगडधिंगा बंदचा निर्णय झाला आणि सोलापूर पॅटर्न तयार झाला.

अशा तऱ्हेने जनसंघटना,जागरूक नागरिक, पोलीस, प्रशासन, डॉक्टर,वकील एकत्र आल्यास सार्वजनिक उत्सवात सुरू झालेल्या अनिष्ट प्रथा कायमच्या बंद होऊ शकतात.त्यासाठी भल्या मोठ्या वर्गणीचा गोळा होतात तो पैसा वाचेल आणि उत्साहाची मजा द्विगुणित करण्यासाठी पारंपरिक वाद्यांचा उपयोग होईल.असा पॅटर्न आपल्या शहरात राबविला पाहिजे.त्यासाठी कोणीतरी पुढाकार घेऊन लोकांना शांतपणे जागवावे हमी सर्वांनी दिली पाहिजे. आपल्या कडे परिवर्तनाचा विचार फारसा रूजत नाही.थोडे जरी कोणी त्यावर बोलले तर त्यांचा समाचार घेणारे भरपूर आहेत. त्यांचा स्वाभिमान ताबडतोब दुखावतो.ते इतरांना धर्म विरोधी ठरवतात.त्यांना आवर घालणारे कोणी नाही.म्हणून त्यांचे फावते. जनचळवळ किंवा समाजातील विविध घटकांच्या मागणीतून लोकांच्या जीवाशी चाललेला खेळ थांबू शकतो.शहरातील संघटनांनी त्यासाठी पुढाकार घ्यावा अशी अपेक्षा आहे.त्यासाठी प्रशासनाने आपणहून डिजे,डॉल्बी,लेझर किरणांवर बंदी आणली पाहिजे.आपल्याकडे किंवा कुठेही गेल्या काही वर्षांपासून केवळ गणेशोत्सवच नव्हे तर सर्वच धर्मातील सण उत्सवात खूप झगमगाट असतो.आपण सगळेच एकमेकांच्या जीवावर उठलेलो आहोत.राजकीय क्षेत्रातील मंडळी लोकानुनयासाठी अशा कार्यक्रमांना प्रोत्साहन देतात.मदत करतात.त्यांनी जर परिवर्तनवादी भूमिका घेतली तर त्यांची मते कमी होण्याची भीती त्यांना वाटते.मग भलेही समाज स्वास्थ्य बिघडले तरी हरकत नाही

अशीच त्यांची भूमिका असते.लोक देखील सारासर विचार करीत नाहीत. लग्नात जीवघेणे डिझेलचा दणदणाट असतो. हळदीला, साखरपुड्यात डिजे वाजतो. वास्तविक सर्वांनाच घातक होईल असे आयोजन होत असते. मात्र विवेकाचा वापर कौटुंबिक चौकटीत देखील होत नसेल तर सार्वजनिक स्वास्थ्य तरी कसे निकोप राहू शकेल यासंबंधीचा विचार केव्हातरी प्रत्येकाने केला पाहिजे.

## धरणाच्या मातीपासून पर्यावरणपूरक बाप्पा नवापूर न.प.लिबर्टी आर्ट्सचा अभिनव उपक्रम



**नवापूर, दि.४ (प्रतिनिधी)- गणेशोत्सवाच्या पार्श्वभमीवर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत नवापूर नगरपरिषद व लिबर्टी आर्ट्स, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने धरणातील नैसर्गिक मातीपासून तयार करण्यात आलेल्या पर्यावरणपूरक श्रीगणेशमूर्ती नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या आकर्षक गणेशमूर्तींची पाहणी लोकनियुक्त नगराध्यक्ष जयवंत जाधव, मुख्याधिकारी डॉ. मयूर पाटील, नगरसेवक अल्तमस खाटीक, माजी उपनगराध्यक्ष फारुक शाह,अभियंता यश मोरे, भुषण शिंदे तसेच सामाजिक कार्यकर्ते राजू आगळे यांनी केली.**

धरणातील नैसर्गिक मातीपासून तयार केलेल्या या गणेशमूर्ती पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त असून त्यांचे घरच्या घरी विसर्जन करता येणार आहे. विसर्जनानंतर मूर्तीची माती पाण्यात मिसळून तिचा वापर झाडे व वृक्षारोपणासाठी करता येणार असल्याने जलप्रदूषण रोखण्यास मदत होणार आहे. या मूर्ती साधारण दोन दिवसांत पाण्यात विरघळत असल्याने पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

यावेळी नगराध्यक्ष जयवंत जाधव यांनी नागरिकांना पर्यावरणपूरक गणेशमूर्ती स्वीकारण्याचे आवाहन केले. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती पाण्यात सहज विरघळत नसल्याने जलप्रदूषणाचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी नागरिकांनी धरणाच्या मातीपासून तयार केलेल्या गणेशमूर्तींना प्राधान्य द्यावे आणि नवापूर नगरपरिषदेच्या या चांगल्या उपक्रमाला शहरवासीयांनी साथ द्यावी, असे त्यांनी सांगितले.

मुख्याधिकारी डॉ. मयुर पाटील यांनी सांगितले की, नवापूर नगरपरिषद व लिबर्टी आर्ट्स यांच्या संयुक्त विद्यमाने हा पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात येत आहे. नैसर्गिक मातीपासून तयार केलेल्या या मूर्ती आकर्षक, मजबूत तसेच वजनाने हलक्या असून त्यांची वाहतूक व ने-आण करणेही सोपे आहे. विसर्जनानंतर उरलेली माती वृक्षारोपणासाठी वापरता येणार असल्याने पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे.

या पर्यावरणपूरक श्रीगणेशमूर्तींची विक्री नगर भवन (टाऊन हॉल), नवापूर येथे सुरू करण्यात आली असून नागरिकांनी योग्य दरात या मूर्ती खरेदी करून पर्यावरण रक्षणाच्या या उपक्रमाला सहकार्य करावे, असे आवाहन नगराध्यक्ष, नगरसेवक व नवापूर नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

निसर्गाचा सन्मान, बाप्पाचे स्वागत; मातीची मूर्ती, पर्यावरणाची हमी! या संदेशातून यंदाच्या गणेशोत्सवात पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचा प्रसार करण्याचा प्रयत्न नवापूर नगरपरिषदेकडून करण्यात येत आहे.



## शहाणा येथे कीटकनाशक फवारणी सुरक्षा बोंडअळी नियंत्रण जनजागृती

**शहादा, दि.४ (प्रतिनिधी)- पावसाळ्यानंतर पिकांवर विविध किडींचा प्रादुर्भाव वाढतो. किडींच्या नियंत्रणासाठी रासायनिक कीटकनाशकांची फवारणी करताना स्वतःच्या आरोग्याचे आणि पिकांचे रक्षण कसे करावे, याबाबत कृषी विभागाच्यावतीने शहाणा येथे शेताच्या बांधावर थेट प्रात्यक्षिकासह जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.**

यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी सुनील सुळे यांनी स्थानिक बोलीभाषेत शेतकऱ्यांना कीटकनाशक हाताळणी व फवारणी करताना घ्यावयाच्या काळजीबाबत मार्गदर्शन केले. औषध खरेदी करताना स्वतंत्र पिशवीचा वापर करणे, अंतिम मुदत तपासणे, कडक उन्हात वाऱ्याच्या विरुद्ध दिशेने फवारणी न करणे आणि उपाशीपोटी फवारणी टाळणे याविषयी त्यांनी सावध केले. फवारणी करताना मास्क, गमबूट, संरक्षक चष्मा व हातमोजे यांसारख्या सुरक्षा किटचा वापर अनिवार्य करावा, फवारणी करताना हवेच्या वीरुध्द दिशेनेच फवारणी करावी व तंबाखू इतर खाद्यपदार्थ खाणे टाळावे, पंप चोक झाल्यास तोंडाने फुंकर न मारता पिन वापरावी आणि रिकाम्या बाटल्यांचा घरगुती वापर न करता त्या जमिनीत पुरून नष्ट कराव्यात असे आवाहन त्यांनी केले.

यानंतर उप कृषी अधिकारी एकनाथ सावळे यांनी कपाशीवरील गुलाबी बोंडअळीच्या प्रभावी नियंत्रणासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीची माहिती दिली. फरदड कापूस न घेणे, कीडग्रस्त पाते व बोंडे नष्ट करणे, तसेच सर्वेक्षणासाठी एकरी २ व नियंत्रणासाठी ८ ते १० कामगंध सापळे लावण्याचा सल्ला त्यांनी दिला. प्रादुर्भाव वाढल्यास निंबोळी अर्क, प्रोफेनोफॉस किंवा इमामेक्टिन बेंझोएटची शिफारशीनुसार फवारणी करण्याचे त्यांनी सुचवले. यासोबतच फळबाग लागवड, ठिबक सिंचन आणि गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेची माहितीही शेतकऱ्यांना देण्यात आली. या जनजागृती कार्यक्रमाला प्रगतशील शेतकरी भामट्या पटले, ग्रामपंचायत सदस्य राकेश सुळे, भाईदास भंडारी, दिवान सुळे, ग्रामपंचायत सदस्य ठेबऱ्या ठाकरे, रोजगार सेवक राजू ठाकरे, सामाजिक कार्यकर्ते पद्माकर सुळे, राकेश तडवी, सोमनाथ जाधव यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मराठा ही जात नसून एक विचार आहे प्रा.डॉ.सदाशिव सुर्यवंशींचे प्रतिपादन

**धुळे, दि.४- जगातील एकमेव वैचारिक संघटन ज्यांच्या शिर्ष स्थानी राष्ट्रमाता मॉसाहेब जिजाऊ या महिला आहेत व जे जगातील सर्व महिलांचा सन्मान करते, जी संघटना विज्ञानवादी दृष्टिकोन स्वीकारते, इतिहासाचे पुराव्यासहित पुनर्परीक्षण करत सत्य इतिहास जनतेच्या समोर आणते, समाजाचे प्रबोधन करून समाजामध्ये विज्ञाननिष्ठ जीवन रुजविते त्या मराठा सेवा संघाचा आज स्थापना दिन. मराठा ही जात नसून तो एक विचार आहे, महाराष्ट्रासाठी, मराठी मुलखासाठी व स्वराज्यासाठी लढणारा प्रत्येक रयत मराठा म्हणून संबोधला जातो. असे प्रतिपादन व्याख्याते तथा विचारवंत डॉ.सदाशिव सुर्यवंशी यांनी केले**

मराठा सेवा संघाच्या ३६ व्या वर्धापन दिनानिमित्त धुळे जिल्हा मराठा सेवा संघाच्या कार्यालयात सुप्रसिद्ध शिवव्याख्याते प्रा डॉ. सदाशिव सुर्यवंशी यांचे मराठा सेवा संघ, काल ,आज,उद्या या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते

सदर कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून चंद्रशेखर भदाणे, तर प्रमुख अतिथी म्हणून गट शिक्षण अधिकारी शुभम पाटील, नांद्रे मॅडम, संदीप पाटील, सुनिल पवार, साहेबराव देसाई, मधुबापू पाटील, बी.ए. पाटील, दिवाण लोटन पाटील, रामकृष्ण पाटील,अविनाश पवार,आर.एन. पाटील, अर्चना खैरनार, अलका बोरसे, हेमंत भडक यांच्यासह अन्य मान्यवर विचारपीठावर उपस्थित होते

प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष संदिप पाटील यांनी केले. व्याख्यानात सुर्यवंशी पुढे म्हणाले की. विश्वकल्याणार्थ वैचारीक दिशा देणारी मुल्याधिष्ठीत विचारधारा म्हणजे मराठा सेवा संघ. मानवतावादी जागतिक वैचारीक चळवळ म्हणजे मराठा सेवा संघ. बारा बलुतेदा, अठरा अलुतेदार तथा बहुजन समाजातील प्रत्येक माणूस मराठा



आहे अशी व्यापक संकल्पना आपण अंगिकारतो. सामाजिक लोकशाहीचा पुरस्कार करणाऱ्या विचारांचा धागा वास्तववादी इतिहासाच्या आधारावर विश्वास ठेवत बुध्दीप्रामाण्यवाद अबाधित ठेवणारा व तात्विक अधिष्ठानावर भरभक्कम उभा असलेला मराठा सेवा संघ वैश्विक प्रबोधनाची चळवळ जोपासतो आहे. बदलत्या जगाचा वेध घेत आजच्या तरूणाईने छत्रपतींचा व राष्ट्रमाता जिजाऊंचा विज्ञानवादी विचार आत्मसात करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन व्याख्याते डॉ.सदाशिव सुर्यवंशी यांनी केले.

याप्रसंगी विविध यश,निवड, नियुक्ती बद्दल, सेवानिवृत्तीनिमित्त सर्व सत्कारार्थींना शिवचरित्र व जिजाऊंची प्रतिमा देऊन विविध मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जिल्हासचिव सुनील पवार यांनी तर आभारप्रदर्शन शिक्षक परिषद जिल्हाध्यक्ष बी.ए. पाटील यांनी केले. सदर कार्यक्रमास गुलाबराव देवरे उपाध्यक्ष, शाम भदाणे, आर. आर. पाटील, भिमराव पाटील, गुलाबराव पाटील, राजेंद्र मोरे, पी.सी. पाटील, प्रविण पाटील, प्रविण देवरे, शाम निरगुडे, सुनिल ठाणगे, सागर भदाणे, दिपक पाटील, वैभव सह्याजी, राजेंद्र पवार, नवनित पाटील, संजय पाटील, मनीषा पवार यांच्यासह असंख्य समाजबांधव व भगिनी हजर होते.

## देवरे तंत्रनिकेतनला विद्यार्थ्यांसाठी व्यक्तीमत्व विकासावर मार्गदर्शन

धुळे, दि.४- श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापूसाहेब शिवाजी राव देवरे तंत्रनिकेतन मध्ये मेकॅनिकल विभागाच्या वतीने बजाज ऑटो व टाटा स्ट्राईव्ह च्या वतीने विद्यार्थ्यांना उद्योग जगताच्या गरजेनुसार आवश्यक कौशल्ये आत्मसात करुन त्यांना रोजगारक्षम बनवणे यासाठी बेसिक मॅन्युफॅक्चरिंग सिस्टीम सर्टिफिकेट प्रोग्रॅम या प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात येणार असून प्रशिक्षणा नंतर विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार असून त्यायोगे विद्यार्थ्यांना उद्योग जगतात नोकरीच्या विस्तृत संधी उपलब्ध होणार आहेत.

या प्रशिक्षणा वर्गात विद्यार्थ्यांना मॅन्युफॅक्चरिंग प्रोसेस, टोटल प्रॉडक्टीव्ह मेंटेनंन्स प्रिन्सिपल्स, प्रॉडक्टीव्हीटी, क्वालिटी, इंडस्ट्रीयल वर्क कल्चर या विषयी माहिती देण्यात येणार आहे. या प्रशिक्षण वर्गात द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थी सहभागी होणार आहेत. टाटा स्ट्राईव्ह चे प्रोजेक्ट को ऑर्डिनेटर सचिन करारे व सतिश ढिवरे फिल्ड को ऑर्डिनेटर यांनी या प्रशिक्षणा वर्गा विषयी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. तंत्रनिकेतन चे प्राचार्य प्रा संजय हिरे यांनी सचिन करारे यांचे स्वागत केले. ट्रेनिंग प्लेसमेंट अधिकारी प्रा सुधीर चौधरी यांनी संयोजन केले. मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा महेंद्र पाटील, प्रा नचिकेत पाटील, प्रा शोएब काझी, प्रा योगेश वैद्य, प्रा राहुल साळुंके, प्रा प्रसाद मराठे, प्रा प्रतिक्षा वाघ व विभागातील सहकारी प्राध्यापक वृंद या प्रसंगी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने या प्रसंगी उपस्थिती दिली. श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष कुणाल पाटील, महाविद्यालयाचे अध्यक्ष सुभाष देवरे, उद्योजक विलास देवरे यांच्या प्रमुख मार्गदर्शनात तंत्रनिकेतन मधील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाने या प्रशिक्षण वर्गाचे संयोजन केले.

## लळींगला दोनशे के.व्ही. ट्रान्सफॉर्मर द्या आ.राम भदाणे यांच्याकडे मागणी

**धुळे, दि.४ (प्रतिनिधी) : धुळे ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील लळींग गावातील वीज पुरवठ्याची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. गावासाठी तातडीने नवीन २०० के.व्ही. क्षमतेचे विद्युत रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) मंजूर करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी आमदार राम भदाणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनानुसार, लळींग गावाचा संपूर्ण वीजपुरवठा मागील अनेक वर्षांपासून केवळ १०० के. व्ही. क्षमतेच्या विद्युत रोहित्रावर अवलंबून आहे. गेल्या काही वर्षांत गावाची लोकसंख्या तसेच वीजेचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे सध्याच्या रोहित्रावर क्षमतेपेक्षा अधिक भार पडत असून, त्याचा परिणाम वीजपुरवठ्याच्या गुणवत्तेवर होत आहे. गावातील नागरिकांना अनेकदा कमी दाबाने वीजपुरवठा होत असल्याने घरगुती उपकरणे तसेच दैनंदिन कामकाजात अडचणी निर्माण होत आहेत. त्याचबरोबर वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याच्या समस्येलाही ग्रामस्थांना सामोरे जावे लागत आहे. विशेषतः वीज वापर वाढलेल्या काळात ही समस्या अधिक तीव्र होत असल्याचे ग्रामस्थांनी निवेदनात नमूद केले आहे.

लळींग गावातील वीजपुरवठा सुरळीत होण्यासाठी आणि नागरिकांची ही समस्या कायमस्वरूपी दूर करण्यासाठी सध्याच्या १०० के.व्ही. रोहित्राऐवजी किंवा त्यास पूरक म्हणून २०० के.व्ही. क्षमतेचे नवीन विद्युत रोहित्र तातडीने उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी आमदार भदाणे यांच्याकडे केली आहे. या निवेदनावर धीरज परदेशी, निलेश जगदाळे, मनोज बळसाणे, निलेश कुलकर्णी, हितेश परदेशी, नंदू बळसाणे, आदेश सावंत, किरण परदेशी, ऋषिकेश वाघ, गंगाराम बारसे, अशोक चव्हाण, राहुल पवार, रोशन परदेशी, विजय ठाकरे, रोहित सोनवणे, राजेश सावंत, गीतंम परदेशी, मयूर वाघ, दीपक सोनवणे, सखाराम गवळी, निलेश महाले आदी ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## एमबीएच्या विद्यार्थ्यांची मधुर फूड पार्कला भेट

शिरपूर, दि.४- आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, शिरपूर येथील व्यवसाय प्रशासन विभाग (एमबीए) यांच्या वतीने एमबीएच्या विद्यार्थ्यांसाठी निमझरी येथील मधुर फूड पार्क येथे औद्योगिक भेट घेण्यात आली. या औद्योगिक भेटीत एमबीएचे ३३ विद्यार्थी व ४ प्राध्यापक सहभागी झाले.

या औद्योगिक भेटीसाठी प्राचार्य डॉ. संजय सुराणा, प्राचार्य डॉ. नितीन हासवाणी, उपप्राचार्य डॉ. अतुल शिरखेडकर यांचे मार्गदर्शन लाभले.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,

मौजे वरवाडे ता.शिरपूर जि.धुळे शिवारातील आहे. शिरपूर वरवाडे नगर परिषद हद्दीत समाविष्ट तिचे सविस्तर वर्णन बिनशेती सर्व्हे क्रमांक ८४/१४ यामधील प्लॉट क्रमांक ३ यांचे एकूण क्षेत्रफळ २१५.६२ चौ.मी. येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत चंद्रकांत गुलाबराव साळुंखे, सुशीला प्रभाकर देवरे, गोपाल प्रकाश धायबर, सुरेश गुलाबराव पाटील यांच्या नावे मालकी हक्काने असून, त्यांच्या प्रत्यक्ष ताबे उपभोगातील मिळकत आहे.

आमचे अशिल पंकज राजेंद्र चौधरी रा.थाळनेर यांनी कायमस्वरूपी मालकी हक्काने वरनमूद मिळकत विकत घेण्याचा सौदा केलेला असून लवकरच नोंदणीकृत खरेदीखताचा व्यवहार करणार आहेत.

तरी वरील मिळकती संदर्भात कोणत्याही कोर्टात वाद असेल, कोणाचा गहाण, सौदा करार, खरेदी-विक्री करार, टाच, बक्षीस, बोजा, लिज, मुखत्यार वगैरे कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा व्यवहार असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत खालील पत्यावर मिळकती संबंधित पुराव्यानिशी व त्याचे झेरॉक्स प्रती जोडून लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरच्या हरकती आमचे अशिलावर तसेच वरनमुद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाहीत. तसेच मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्बोज समजण्यात येईल व आमचे अशील त्यांचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर मात्र कोणाची हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोद घ्यावी.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगण्यावरून आमच्या मार्फत प्रसिद्धीस दिली असे. दिनांक- ३१/०८/२०२६.

**ॲड.प्रदिप युवराज राजपूत**
ऑफिस- न्यायालय समोर, न.पा.शॉपींग कॉम्प्लेक्स, शिरपूर, जि.धुळे.
**मो.नं.९६३७२३१९०१**

ॲड.विलास सुकदेव वाघ, शिंदखेडा

### जाहिर नोटीस चोपडा येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर यांचे न्यायालयात

दि.कि.अर्ज नं.२४२/२०२६
नि.नं.७, चौ.ता.१३/१०/२०२६

सुलोचना वासुदेव चौधरी, उ.व.५२, धंदा- गृहीणी,
रा.प्लॉट नं.६०/ब, एस.आर.पी.सोसायटी,
नकाणे रोड, देवपूर, धुळे, ता.जि.धुळे. ....अर्जदार
विरूध्द
रायाबाई खंडू चौधरी वगैरे १ ....जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार ही मयताची धर्मपत्नी आहे. अर्जदाराचे मयत पती नामे कै.वासुदेव खंडू चौधरी हे तारीख १४/०५/२०२६ रोजी मौजे चोपडा ता.चोपडा जि.जळगांव येथे मयत झालेले आहेत. त्यांच्या मृत्युपश्चात अर्जदार हीच पत्नी म्हणून एकमेव कायदेशीर वारस आहे. अर्जदाराला कै. वासुदेव खंडू चौधरी यांच्या पश्चात मिळणारे लाभ दान १) भविष्य निवार्ह निधी रक्कम २) गट विमा रक्कम रुपये २,४०,०००/- मात्र ३) गट विमा वर्गणी व त्यावरील व्याजाची रक्कम, ४) रजा रोखीकरण रक्कम, ५) अनुकंपाखालील नोकरी, ६) मयताचे सर्व्हिस बुक संबंधीत ७) तसेच मयताच्या मृत्युपश्चात त्याच्या विधवा पत्नीस पेंशन मिळण्यासाठी, कागदपत्रे मिळवण्यासाठी आवश्यकता असल्याने अर्जदारांनी संबंधीत जाबदेणार क्रं.२ यांच्याकडे मागणी केली असता, संबंधीत जाबदेणार क्रं.२ यांनी अर्जदाराला तोंडी समज दिली की, तुम्ही सक्षम न्यायालयाकडुन वारस दाखला घेवून या तरच आम्ही तुम्हांला तुम्ही मागणी करीत असलेल्या वर नमुद ७ कागदपत्रांची पुर्तता करु, मयतास अर्जदार हीच एकमेव कायदेशीर वारस आहे, म्हणून अर्जदाराने मे.कोर्टात इंडियन सक्सेशन ॲक्ट ३७२ खाली कायदेशीर वारसांचा दाखला मिळणेबाबत अर्ज मे.न्यायालयात त्यांनी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीशीने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदारां व्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यानी मे.न्यायालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत अगर दि.१३/१०/२०२६ रोजी ठिक सकाळी १०:३० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधींमार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी, लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाही, असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार याने केलेल्या मागणीप्रमाणे देण्यांत येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे.दिवाणी न्यायाधीश सो., क.स्तर, चोपडा जि.जळगांव यांचे आदेशावरुन प्रसिध्दीस दिली असे.

| सही/- | | सही/- |
|---|---|---|
| कनिष्ठ लिपीक | शिक्का | सहा.अधिक्षक |
| दिवाणी न्यायालय, चोपडा | | दिवाणी न्यायालय, चोपडा |

ॲडव्होकेट, प्रमोद एस.परदेशी, शिंदखेडा
Exh.6/D

### जाहिर समन्स/नोटीस शिंदखेडा येथील मे.सिव्हील जज्ज साहेब ज्युनिअर डिव्हीजन यांचे न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज नं.२७७/२०२६

१) यमुनाबाई भिकन दुसाने (सोनार), वगैरे ....अर्जदार
विरूध्द
कुणीही नाही ....जाबदेणार
कै.भिकन त्र्यंबक सोनार (मयत), (मृत्यू दि.१४/०७/२०२५),
मृत्यू ठिकाण- सुरत (गुजरात) ....मयत

तमाम लोकांना जाहिर समन्स/नोटीसीने कळविण्यात येते की, अर्जदार नं. (१) यमुनाबाई भिकन दुसाने (सोनार), रा.मुडावद, ता.शिंदखेडा, जि.धुळे (२) प्रेमचंद भिकन दुसाने, रा.मुडावद, ता.शिंदखेडा, जि.धुळे. ह.मु.सुरत, ता.जि.सुरत (गुजरात) (३) अमरचंद भिकन दुसाने, रा.मुडावद, ता.शिंदखेडा, जि.धुळे. (४) मिराबाई प्रकाश वडनेरे, रा.शाळा नं.१४ जवळ, शनि नगर, साक्रीरोड, धुळे, ता.जि.धुळे. (५) जयाबेन सुर्यकांतभाई सोनवणे, रा.१०९, रॉयल स्टार टाऊनशिप, डिंडोली, सुरत (गुजरात) (६) संगिता विनायक मोरे, रा.नरडाणे, ता.शिंदखेडा, जि.धुळे यांनी या न्यायालयात अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.२ ते ६ यांचे वडील भिकन त्र्यंबक सोनार हे दि.१४/०७/२०२५ रोजी सुरत (गुजरात) येथे अर्जदार नं.२ मुलाकडे वैद्यकीय उपचारार्थ गेले असतांना दवाखान्यात उपचार घेत असतांना अचानक मयत झाले आहेत, त्यांना अर्जात नमुद केल्याप्रमाणे अर्जदार नं.१ ते ६ हेच एकमेव कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांना शासकीय कामासाठी तसेच महसुल कामासाठी वारस दाखला आवश्यक असल्याने अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेसाठी दिवाणी किरकोळ अर्ज नं.२७७/२०२६ चा अर्ज दाखल केलेला आहे.

वरील अर्जाचे कामी कुणाची काही हरकत, तक्रार अगर वारसांबाबत आपला हितसंबंध असल्यास शिंदखेडा न्यायालयात पुढील ता.२३/०९/२०२६ रोजी आपली हरकत अगर म्हणणे मांडण्यासाठी आपण स्वतःअगर आपल्याकडील वकील लावून हजर रहावे, कुणाचीही तक्रार, हरकत न-आल्यास अर्जाचे चौकशीचे काम नियमानुसार चालविणेत येईल.

सदरचे जाहिर नोटीस आमचे सहीनिशी व मे.कोर्टाच्या सही शिक्कानिशी आज दि.१७/०८/२०२६ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

हुकूमावरून

| कामगिरी कारकून | शिक्का | सहा.अधिक्षक |
|---|---|---|
| दिवाणी न्यायालय क-स्तर, शिंदखेडा | | दिवाणी न्यायालय क-स्तर, शिंदखेडा |

### जाहिर नोटीस शिरपूर येथील मे.सिव्ही.जज्ज सो. ज्यु.डि. यांचे कोर्टात

दि.कि.अर्ज नं.७०४/२०२६, नि.

जगदीश मधुकर सोनार ....अर्जदार
विरूध्द
धनराज सदाशिव सोनार, वगैरे ....जाबदेणार

ज्याअर्थी मयत अर्जदार यांचे आजोबा नामे सदाशिव देवचंद सोनार हे दि.२४/०९/२००४ रोजी मौजे करवंद, ता.शिरपूर, जि.धुळे येथे मयत झालेले असून अर्जदार व जाबदेणार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेगयुलेशन अधिनियम १८२७, कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि.०८/०९/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून, हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि.३/९/२०२६

| कनिष्ठ लिपीक | शिक्का | सहा.अधिक्षक |
|---|---|---|
| दिवाणी न्यायालय, | | दिवाणी न्यायालय, |
| शिरपूर, जि.धुळे | | शिरपूर, जि.धुळे |

प्रकाश में आज खोज




रूषी कपूर नसीरूद्दीन शाह डेनी किमि काटकर माणिक ईराणी ओमशिवपुरी

TO BOOK TICKETS SCAN THE QR
ज्योती सिनेमा 3D JYOTI
DOLBY DIGITAL PLUS




ता.०५ से रोज ४ खेल टा. १२,३,६,९ बजे
हनुमान अंश (हिंदी)
bookmyshow my show my time my seat
9422789999/9823177599 Jyoticinemadhule.

पान १ वरुन

## निशूच्या वडिलांवर हल्ला

करण्यात आला आहे. संबंधित व्हिडिओ समाज माध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर या प्रकरणावरून राजकीय आणि सामाजिक संघटनांकडून पोलिसांवर कारवाईचा दबाव वाढला. सीजेपीचे आशुतोष रांका आणि सौरव दास, काँग्रेस विद्यार्थी आघाडीचे विनोद जाखड, आझाद समाज पार्टीचे नेते आणि खासदार चंद्रशेखर आझाद यांच्यासह काही कार्यकर्ते संसद मार्ग पोलीस ठाण्यात पोहोचले होते. त्यांनी पोलिसांची भेट घेऊन स्वतंत्र भारद्वाजविरोधात कारवाई करण्याची मागणी केली. पोलिसांसोबत सुमारे दोन तास चर्चा झाल्यानंतर या प्रकरणात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याबाबत निर्णय झाल्याचे सांगण्यात आले. तसेच संजयकुमार यांची पुन्हा वैद्यकीय तपासणी करण्यात येणार असून, वैद्यकीय अहवालाच्या आधारे हत्येचा प्रयतक केल्याचे कलम लागू करण्याबाबत निर्णय घेतला जाणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. या प्रकरणात स्वतंत्र भारद्वाज याला ७२ तासांच्या कालावधीत अटक केली जाईल, असे पोलिसांनी संबंधित नेत्यांना सांगितले होते. दरम्यान, सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनीही समाजमाध्यमांवरील पोस्टमध्ये संबंधित आरोपीविरोधात दाखल झाल्याचा दावा केला होता. या प्रकरणात एफआयआर दाखल करण्यास सुमारे दोन महिन्यांचा कालावधी लागल्याचा आरोप दीपके यांनी केला. पोलिसांसमोर घडलेल्या घटनेप्रकरणी कारवाईला विलंब झाल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. सौरव दास यांनीही पोलिसांना सायंकाळपर्यंत कारवाई करण्याची मुदत दिल्याचे सांगण्यात आले होते. योग्य कारवाई न झाल्यास पोलीस ठाण्याला घेराव घालण्याचा इशारा त्यांनी दिला होता.

पॉडकास्टमध्ये भारद्वाजचा दावा काय

पॉडकास्टमध्ये स्वतंत्र भारद्वाजने संजयकुमार यांच्या डोक्याला दुखापत झाल्याचा आणि त्यांना टाके पडल्याचा उल्लेख केला होता. तसेच निशू आझाद पोलीस ठाण्याबाहेर आंदोलन करत असताना आपण दुसऱ्या दिवशी बाहेर असल्याचा दावाही त्याने केला होता. दरम्यान, स्वतंत्र भारद्वाज याला पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर या प्रकरणाच्या चौकशीला वेग आला असून, पुढील कारवाई वैद्यकीय अहवाल आणि तपासातून स्पष्ट होणार आहे.

## अमली पदार्थांना धुळ्यात थारा नाही

नेतृत्वाखाली राज्य शासनाने अमली पदार्थांविरोधात कठोर भूमिका स्वीकारली आहे. त्याच धर्तीवर धुळे जिल्ह्यातही अमली पदार्थांची विक्री, वाहतूक, तस्करी आणि अवैध लागवडीविरोधात प्रभावी कारवाई करावी.अमली पदार्थांचा प्रश्न केवळ पोलीस विभागापुरता मर्यादित नसल्याचे सांगून पालकमंत्री श्री. रावल यांनी होल ऑफ द गव्हर्नमेंट दृष्टिकोनातून काम करण्यावर भर दिला. महसूल, पोलीस, कृषी, वन, शिक्षण, आरोग्य, नगरविकास, परिवहन तसेच संबंधित सर्व विभागांची जबाबदारी निश्चित करून कालबद्ध कार्यवाही करावी. विभागांमध्ये माहितीची तातडीने देवाणघेवाण करून संयुक्त तपासणी आणि कारवाई अधिक प्रभावी करावी, असे निर्देश त्यांनी दिले. धुळे जिल्ह्याला गुजरात आणि मध्य प्रदेश राज्यांच्या सीमा लागून असल्याने तस्करीविरोधात अधिक दक्ष राहण्याची गरज असल्याचे पालकमंत्री श्री. रावल यांनी सांगितले.

प्रमुख महामार्ग, रेल्वेमार्ग आणि जिल्ह्यातील विविध प्रवेशमार्गांवर विशेष लक्ष ठेवून संशयास्पद वाहतूक व हालचालींची तपासणी करावी. आंतरराज्य यंत्रणांशी आवश्यक समन्वय साधून अमली पदार्थांच्या वाहतुकीला जिल्ह्याच्या सीमांवरच प्रभावीपणे प्रतिबंध करण्यासाठी प्रयतक करावेत, असे त्यांनी सांगितले. अमली पदार्थांच्या प्रकरणांमध्ये केवळ जप्ती अथवा समोर आलेल्या व्यक्तीवर कारवाई करून तपास थांबवू नये, असे स्पष्ट करत पालकमंत्री श्री. रावल यांनी प्रत्येक प्रकरणाच्या मुळाशी जाण्याचे निर्देश दिले. अमली पदार्थ कोठून आले, त्याचा पुरवठादार कोण, वाहतूक कोणी केली, ते कोणाला दिले जाणार होते आणि पुढील वितरणसाखळी कोणती होती, याचा सखोल तपास करून संपूर्ण नेटवर्कवर कठोर कारवाई करावी. बेकायदेशीर गांजा पीक आढळल्यास त्याचे बियाणे कुठून आले, लागवडीमागे कोण आहे आणि उत्पादन कोणाला पुरविले जाणार होते, याचाही शोध घ्यावा, असे त्यांनी स्पष्ट केले.या मोहिमेत कोणत्याही स्तरावरील हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा देत पालकमंत्री श्री. रावल म्हणाले की, अमली पदार्थांच्या अवैध व्यवसायाला मदत, संरक्षण अथवा जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे कोणत्याही विभागातील अधिकारी किंवा कर्मचाऱ्याबाबत निष्पन्न झाल्यास निलंबनासह नियमानुसार कठोर विभागीय कारवाई प्रस्तावित करावी. अमली पदार्थांच्या प्रकरणांमध्ये एनडीपीएस कायद्यातील लागू तरतुदींनुसार कठोर कायदेशीर कारवाई करावी. सायकोट्रॉपिक पदार्थ तसेच डॉक्टरांच्या वैध प्रिस्क्रिप्शनशिवाय विक्रीस प्रतिबंधित असलेल्या औषधांच्या गैरवापरावरही विशेष लक्ष ठेवण्याचे निर्देश पालकमंत्री श्री. रावल यांनी दिले. आरोग्य यंत्रणा आणि औषध प्रशासनाने औषध विक्री केंद्रांची तपासणी व देखरेख वाढवावी. संशयास्पद अथवा नियमबाह्य विक्री निदर्शनास आल्यास संबंधितांविरुद्ध तातडीने नियमानुसार कारवाई करावी, असे त्यांनी सांगितले. युवा पिढीला अमली पदार्थांपासून दूर ठेवण्यासाठी शाळा-महाविद्यालयांच्या परिसरावर विशेष लक्ष केंद्रित करावे, असे पालकमंत्री श्री. रावल यांनी सांगितले. शैक्षणिक संस्थांच्या परिसरातील संशयास्पद हालचालींवर नजर ठेवून अनधिकृत तसेच संशयास्पद व्यवसाय करणाऱ्या टपऱ्यांची महानगरपालिका, नगरपालिका आणि संबंधित यंत्रणांनी तपासणी करावी. विद्यार्थ्यांना लक्ष्य करून अमली पदार्थांची विक्री किंवा पुरवठा होणार नाही, यासाठी पोलीस आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी विशेष दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले. येत्या दोन आठवड्यांत जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये विशेष मोहीम राबवून प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) निश्चित करावी, असे पालकमंत्री श्री. रावल यांनी सांगितले. प्रत्येक शैक्षणिक परिसर ड्रग-फ्री कॅम्पस करण्यासाठी संस्थाचालक, प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि पोलीस यंत्रणेचा सक्रिय सहभाग घ्यावा. विद्यार्थ्यांना अमली पदार्थांच्या शारीरिक, मानसिक, कौटुंबिक आणि सामाजिक दुष्परिणामांची माहिती देऊन व्यसनमुक्तीची शपथ, जनजागृती आणि संवादात्मक उपक्रम राबवावेत. अमली पदार्थांविरोधातील लढ्यात कठोर कारवाईबरोबरच प्रतिबंध, समुपदेशन आणि पुनर्वसनही तितकेच महत्त्वाचे असल्याचे पालकमंत्री श्री. रावल यांनी नमूद केले. व्यसनात अडकलेल्या व्यक्तींना आवश्यकतेनुसार समुपदेशन, वैद्यकीय उपचार आणि पुनर्वसनाची मदत उपलब्ध करून द्यावी. अमली पदार्थांची तस्करी आणि पुरवठा करणाऱ्यांवर कठोर कारवाई करतानाच व्यसनाधीन व्यक्तींना पुन्हा समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने प्रयतक करावेत, असे त्यांनी सांगितले.ड्रग-फ्री धुळे हे केवळ प्रशासनाचे अभियान न राहता लोकचळवळ बनले पाहिजे, असे आवाहन करत पालकमंत्री श्री. रावल म्हणाले की, अमली पदार्थांचे व्यसन केवळ एका युवकाचे आयुष्य उद्ध्वस्त करत नाही, तर त्याच्यासोबत संपूर्ण कुटुंबाची स्वप्ने, आई-वडिलांच्या अपेक्षा आणि समाजाचे भविष्यही अंधारात ढकलते. जिल्ह्यातील एकही मुलगा किंवा मुलगी व्यसनाच्या विळख्यात अडकू नये आणि कोणत्याही आई-वडिलांच्या डोळ्यांत आपल्या मुलाच्या भविष्याबद्दल अश्रू येऊ नयेत, यासाठी प्रत्येक धुळेकराने या लढ्यात सहभागी व्हावे. धुळे जिल्ह्यातील प्रत्येक तरुण हा आपल्या कुटुंबाचेच नव्हे, तर जिल्ह्याचे आणि देशाचे भविष्य आहे. त्यांचे आयुष्य अमली पदार्थांच्या विळख्यात उद्ध्वस्त होऊ देणार नाही, हा संकल्प आपण सर्वांनी करूया. प्रशासन कठोर कारवाई करेल; मात्र घराघरातून जागरूकता आणि समाजातून सक्रिय साथ मिळाली तरच ही लढाई आपण निर्णायकपणे जिंकू शकतो. आपल्या मुलांच्या स्वप्नांसाठी, त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि सुरक्षित धुळ्यासाठी ड्रग-फ्री धुळे ही प्रत्येक नागरिकाची चळवळ बनवूया, असे भावनिक आवाहन पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.

## सटीपाणी येथे गांजाची शेती उध्वस्त

अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पथकात मुकेश पवार, विकास गुंजाळ, महेश निकम, पोलीस हवालदार दत्तात्रय बागल, जितेंद्र पाडवी, स्वप्नील गोसावी, मोहन ढमढेरे, पोलीस अंमलदार भरत उगले, शोएब शेख, विशाल मराठे, सतीश घुले यांचा समावेश होता.

पान १ वरुन

## ऋतूजा पाटीलने केला मोबाईलचा पुरावा गायब

व आयोगात सहाय्यक्र कक्ष अधिकारी असलेला गोपाळ मराठे याच्यावर पेपर फूटीच्या बाबतीत संशय असून मयुर ठाकरे याचेही नाव समोर आले आहे.परंतू मयुर ठाकरे याच्यावर अद्यापही गुन्हा दाखल झालेला नाही.एकंदरित पेपर फूटी प्रकरणामुळे नंदुरबारला बदनामीच्या फे-यात अडकावे लागल्याने नंदुरबारकरांमध्ये या प्रकरणाची चिड निर्माण आलेली आहे.कधी विजय चौधरी ऑडीयो क्लीप तर कधी सेक्स.स्कँडलमुळे नंदुरबार बदनाम झालेले असतांना अचानक पेपर फुटीमुळे नंदुरबारचे नाव रोज चर्चेत आहे.ऋतूजा पाटील हिच्याकडून मोबाईल जप्त. करण्यात येणार असून आता पर्यंत महत्वाचे पुरावे प्रविण पाटील याच्याकडून जप्त.करण्यात आले आहे.

## स्मार्ट मीटर लावणाऱ्या पथकावर हल्ला

त्यांच्यासोबतच्या अन्य तीन अनोळखी व्यक्तीं एकत्र आले. संशयितांनी शासकीय कामात अडथळा निर्माण केला. जमावातील युवकांनी महावितरणचे तंत्रज्ञ चंद्रकांत पाटील यांना शिवीगाळ करून धक्काबुक्की केली, लाकडी दांडक्याने मारहाण केली. त्यात चंद्रकांत पाटील यांच्या डोके, खांद्याला दुखापत झाली. या प्रकरणी धुळे तालुका पोलिस ठाण्यात संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक अभियंता प्रविण यादव भामरे (४८) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार वरील संशयीतान विरुद्ध धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. संशयित सागर पाटील याला अटक करण्यात आली. पोलीस निरीक्षक धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक प्रशांत राठोड तपास करीत आहेत.

## देऊर-म्हसदी मार्गावर बसला ट्रकची धडक

अपघात घडल्याची प्राथमिक माहिती आहे.बसचे चालक पी.एन. वाणी व वाहक मनिषा विश्वास साळुंखे हे धुळे आगारातील कर्मचारी आहेत. ट्रक चालक वाहिद सत्तार पठाण असल्याची माहिती देण्यात आली. या अपघातात बस वाहकाच्या पायाला दुखापत झाली आहे. घटनेची माहिती मिळताच नेर दूरक्षेत्र पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिस कर्मचाऱ्यांनी जखमी विद्यार्थ्यांना तातडीने साक्री ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. अपघाताची माहिती मिळताच शिवसेनेचे जिल्हाप्रमुख डॉ. तुळशीराम गावित यांनी साक्री ग्रामीण रुग्णालयात जाऊन जखमी विद्यार्थ्यांची विचारपूस केली.

अपघाताची माहिती मिळताच साक्री आगाराचे आगार व्यवस्थापक राजेंद्र शिवाजी अहिरे यांनी घटनास्थळी जाऊन परिस्थितीची पाहणी केली. धुळे विभागाचे विभाग नियंत्रक पुरुषोत्तम व्यवहारे यांनीही घटनास्थळी भेट देऊन अपघाताची माहिती घेतली. जखमी विद्यार्थ्यांमध्ये गुंजन मोतीलाल देवरे, नंदिनी देविदास नेरकर, सानिया सलीम पिंजारी, नंदिनी गोकुळ नेरकर, मीनाक्षी पाटील, अश्विनी खैरनार, वैष्णवी संजय शिंदे, निलेश्वरी यशवंत खैरनार, पल्लवी प्रभाकर गायकवाड, हर्षदा सुनील साळुंखे, गायत्री कौतिक साळुंखे, पूजा शिंदे, मृणाली प्रकाश अहिरे, त्रिवेणी अनिल शिंदे, मीनाक्षी गुलाब पाटील, अश्विनी चंद्रकांत खैरनार, रक्षा दीपक शिंदे, प्राची रावसाहेब महाले, नंदिनी साळुंखे, भूमिका देविदास, मानसी भाईदास, जानवी भामरे, चित्रा पाटील, हर्षदा भाऊसाहेब, निशा प्रवीण पाटील, नूतन प्रवीण पाटील, भूमिका देवेंद्र देवरे, साक्षी देविदास वाघ, मयुरी धनराज सूर्यवंशी, सृष्टी राकेश देवरे, संजीवनी जयराम बच्छाव, दर्शना संतोष पाटील व साक्षी दिलीप देसले यांचा समावेश आहे.हे सर्व विद्यार्थी म्हसदी येथील स्वर्गीय अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय तसेच सी. डी. देवरे ज्युनिअर कॉलेजमधील असल्याची समजते.

## आदर्श शिक्षक पुरस्कार

मुलाखती घेण्यात आल्या. त्यातील दिनेश गुलाबराव धनगर जि.प.शाळा नरडाणा स्टेशन, ता.शिंदखेडा., श्रीमती मुबश्शेरा किफायत खान जि.प.शाळा पिंपळनेर ता.साक्री व चंपालाल गयबू पाटील जि.प.शाळा लौकी, ता.शिरपूर यांची आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

## सहा महिने सश्रम कारावासाची शिक्षा

जगताप याला ताब्यात घेतले. चालक देवा गावीत यांच्या फिर्यादीवरून गु.र.नं. २५२/२०२५, बी.एन.एस. कलम १३२, ११८(१) व ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास नंदुरबार तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस हेड कॉन्स्टेबल अशोक बहीरम यांनी केला. तपासादरम्यान महत्त्वाचे पुरावे संकलित करून आरोपीविरुद्ध मुदतीत दोषारोपपत्र मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, नंदुरबार यांच्या न्यायालयात दाखल करण्यात आले. खटल्याची सुनावणी मा. मुख्य न्यायदंडाधिकारी श्री. एस. एन. भावसार यांच्या न्यायालयात झाली. सरकार पक्षातर्फे फिर्यादी, डॉक्टर, साक्षीदार, पंच तसेच तपास अधिकारी यांच्या साक्षी महत्त्वपूर्ण ठरल्या. सबळ पुराव्यांच्या आधारे आरोपी मंगू सजन जगताप याच्याविरुद्ध गुन्हा सिद्ध झाल्याने न्यायालयाने त्याला बी.एन.एस. कलम १३२ व ११८(१) अन्वये दोषी ठरवून ६ महिन्यांचा सश्रम कारावास आणि एकूण १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. तसेच दंडाच्या रकमेतून ८ हजार रुपये फिर्यादी देवा नामदेव गावीत यांना नुकसानभरपाई म्हणून देण्याचे आदेश दिले. या खटल्याचे कामकाज सरकार पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता एम.ए. सैय्यद यांनी पाहिले. मुख्य पैरवी अधिकारी म्हणून पोलीस उपनिरीक्षक योगिता राठोड, पोलीस उपनिरीक्षक सुनील भामरे, तर पैरवी अंमलदार म्हणून पोलीस हेड कॉन्स्टेबल गणेश धनगर, पोलीस हेड कॉन्स्टेबल शैलेंद्र प्रकाश जाधव आणि महिला पोलीस कॉन्स्टेबल भावना पाटील यांनी काम पाहिले.

पान १ वरुन

## सतरा मेंढ्या लंपास

असलेल्या या चोरीच्या घटनांमागे एखादी सराईत टोळी कार्यरत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या संदर्भात पोलिसांत तक्रारी नोंदवूनही प्रशासन गांभीर्याने पाहत नसल्याने, गुरुवारी मेंढपाळ विकास परिषदेच्या नेत्या शारदा देवी पांढरे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने नरडाणा व सोनगीर पोलिसांना निवेदन दिले होते. चोरीच्या घटनांचा १५ दिवसांत उकल न झाल्यास कुटुंब कबिल्यासह पोलीस ठाण्यात ठाण मांडण्याचा निर्वाणीचा इशाराही यावेळी देण्यात आला होता.मात्र, या निवेदनाला २४ तास पूर्ण होण्याआधीच गुरुवारी मध्यरात्री दीड ते दोन वाजेच्या सुमारास चोरांनी पुन्हा आपला हातसाफ केला. धुळे तालुक्यातील देवभाने गावाच्या पश्चिमेकडील तलावाजवळ असलेल्या शेतशिवारात, मल्हारपाडा,सायने येथील मेंढपाळ आबा सुका ठेलारी यांचा वाडा आहे. अज्ञात चोरट्यांनी कुंपणाची तार कापून वाड्यात प्रवेश केला आणि सुमारे १७ मेंढ्या चोरून नेल्या. कुत्र्यांच्या भुंकण्यामुळे मेंढपाळ जागे झाले, परंतु तोपर्यंत चोरांनी पळ काढला होता.शुक्रवारी सकाळी या घटनेची माहिती मिळताच सोनगीर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक तुषार देवरे आणि प्रभारी सरपंच लखन ठेलारी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. शुक्रवारी सायंकाळी उशिरापर्यंत घटनेचा पंचनामा करण्याचे काम सुरू होते.सतत होणाऱ्या या चोऱ्यांमुळे मेंढपाळ बांधव पूर्णपणे त्रस्त झाले असून, घटनांची रीतसर नोंद घेऊनही पोलीस प्रशासन लक्ष देत नसेल, तर आम्ही न्याय कुणाकडे मागायचा? असा उद्विग्न सवाल आता मेंढपाळांकडून उपस्थित केला जात आहे.

## मराठा समाजातर्फे प्रतिकात्मक अंत्ययात्रा

लवकरात लवकर जरांगे पाटील यांच्या मागणीनुसार मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली. यावेळी पोलिसांकडून मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांना ताब्यात घेण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून मनोहर टाकी च्या समोरून अंत्ययात्रेची सुरुवात झाली आणि खंडेराव बाजार येथे पोलिसांनी अंतयात्रेसह ताब्यात घेतली.यावेळी मराठा समाजाचे भानुदास बगदे, विनोद जगताप, भैय्या शिंदे, मनोज ढवळे, विकास बाबर, आबा कदम, उल्हास यादव, दिपक रौंदळ, ॲड. दिनेश काळे, उल्हास पाटील, वामन मोहिते, कैलास वाघारे, प्रभाकर वाघ, रविंद्र नागणे, मुकुंद शिंदे, विरेंद्र मोरे, सुरेश पवार, श्याम रायगुडे, प्रफुल्ल माने, संतोष लकडे, बाळासाहेब ठोंबरे, राकेश भोसले, नैनेश साळुंके, उज्वल वाळके, भानुदास चौधरी, श्रीरंग जाधव, अनिल बगदे, देसले बाबा यांच्यासह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

पान १ वरुन

## चाळीत केवळ चाळीस टक्के कांदा

**४०० ते ५०० रुपयांची घसरण झाली होती.**

सरकारी हस्तक्षेपाचा परिणाम अल्पकाळ टिकला असून चालू सप्ताहात कांद्याच्या दरात पुन्हा वाढ झाली आहे. यंदा केंद्र सरकारकडे राखीव कांद्याचा साठा तुलनेने कमी असल्याने आगामी काळात मोठ्या प्रमाणात सरकारी कांदा बाजारात आणणे शक्य होईलच, असे चित्र नाही. नाशिक जिल्ह्यात चाळींमध्ये साठवलेल्या उन्हाळ कांद्यापैकी सुमारे ६० ते ६५ टक्के कांदा विकला गेला आहे. त्यामुळे आता अंदाजे ४० टक्के साठा शिल्लक असल्याचे बाजारातील जाणकारांचे म्हणणे आहे. पावसामुळे चाळींमध्ये साठवलेल्या कांद्याची गुणवत्ता खालावत असून काही प्रमाणात कांदा खराब होत आहे. यामुळे प्रत्यक्ष बाजारात उपलब्ध होणारा कांद्याचा साठा आणखी कमी होण्याची शक्यता आहे. सध्याचा उपलब्ध साठा ऑक्टोबरच्या मध्यापर्यंत पुरेल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यानंतर नवीन कांद्याची आवक अपेक्षेप्रमाणे झाली नाही तर बाजारातील उपलब्धता कमी होऊन दर आणखी वाढण्याची शक्यता आहे.

## सकल मराठा समाजाचा पाठींबा

मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून आंदोलनावर तातडीने तोडगा काढावा, मराठा समाजाच्या भावना शासनापर्यंत पोहोचवाव्यात अशी विनंती यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी केली. यावेळी मराठा समाजातील विजय मराठे, मच्छिंद्र मराठे, अशोक मराठे,प्रवीण नांद्रे,पोपटराव मराठे, लोटन मराठे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## खासदार डॉ.बच्छाव यांचा मोबाईल हॅक

मेसेज पाठवण्यास सुरुवात केली. यामुळे संपर्कातील व्यक्तींमध्ये एकच खळबळ उडाली.संशय आल्याने काही व्यक्तींनी थेट खासदारांशी संपर्क साधल्यामुळे हा फसवणुकीचा प्रकार तात्काळ उघडकीस आला. प्रकार समजताच डॉ. शोभा बच्छाव यांनी सायबर पोलिसांशी संपर्क साधला. सायबर पोलिसांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेत तांत्रिक तपासाच्या आधारे काही वेळातच खासदारांचा मोबाईल पुन्हा सुरक्षित केला.या घटनेमुळे पुन्हा एकदा सायबर फसवणुकीचा धोका अधोरेखित झाला असून, कुरिअर, बँक किंवा कोणत्याही अनोळखी लिंकवर नागरिकांनी विश्वास ठेवू नये आणि सतर्क राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सायबर पोलीस सध्या मोबाईल हॅक करणाऱ्या अज्ञात हॅकर्सचा शोध घेत आहेत.

नोकरीच्या सुवर्णसंधी
एकदंत स्पिनिंग प्रा. लि. तर्फे आमच्या वाढत्या संस्थेसाठी पात्र, अनुभवी व प्रमाणिक उमेदवारांकडून खालील पदांसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.
ठिकाण : अवधान MIDC, धुळे येथील स्पिनिंग मिल
रिक्त पदे :
- Sr. Accountant – वरिष्ठ लेखापाल
- Jr. Accountant – कनिष्ठ लेखापाल
- Electrician – इलेक्ट्रीशियन
- MIS Executive – एमआयएस कार्यकारी




व्यावसायिक क्षेत्रात प्रगती करण्याची इच्छाअसलेल्या तसेच कापड उद्योगातील प्रगतिशील संस्थेसोबत करिअर घडविण्यास इच्छुक उमेदवारांनी अर्ज करण्यास प्रोत्साहित केले जाते.
इच्छुक व पात्र उमेदवारांनी आपला अर्ज सादर करावा.
ekdanta SPINNING
संस्था : एकदंत स्पिनिंग प्रा. लि.
कार्यालय : अवधान MIDC, धुळे, महाराष्ट्र
उद्योग : स्पिनिंग / टेक्सटाईल मॅन्युफॅक्चरिंग
ई-मेल : hr@ekdantaspinning.com संपर्क : 8669988654
"आपल्या उज्वल करिअरसाठी आमच्या वाढत्या टीमचा एक भाग बना!"

सोफा, डायनींग टेबल, सोफा- कमबेड, पलंग, दिवान, टिपाई, कपाट, ड्रेसींग टेबल, आराम चेअर, ऑफीस टेबल ऑफीस चेअर तसेच वास्तु-शास्त्रा योग्य शेवन लाकडाचे मंदिर तसेच मार्बलचे मंदिर आणि तुळशी वृंदावन..



शिवम कॉर्पोरेशन
प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे
फो. 9595397718, 9665886722

पाहिजेत
गरुड मैदान कॉम्प्लेक्स येथे सुरू होणाऱ्या नवीन रेडीमेड गारमेंट्स शोरूमसाठी जागा भरणे आहेत!
अनुभवी सेल्समन– ५ जागा
हेल्पर– २ जागा
अनुभवी व इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा.
-: संपर्क :-
+91 90493 50591

पाहिजेत
१. रिसेप्शनिस्ट ... ०२
२. लॅब टेक्नीशियन ... ०२
३. कलेक्शन बॉय ... ०३
(BLOOD SAMPLE)
४. कॉम्प्युटर ऑपरेटर...०१
(CMLT/DMLT)
असल्यास प्राधान्य
अर्जासह समक्ष भेटावे.
वेळ : १२ ते ५ वाजेपर्यंत.
हाय-टेक पॅथॉलॉजी लॅब
गल्ली नं. २, जुनी महामनगरपालिके मागे ॲक्सीस बँकेशेजारी, धुळे.
9403261209

गणपती बाप्पा मोरया
बाप्पाच्या आवडीचे
मोदक
फक्त मदर्स किचनमध्येच
१) उकडीचे मोदक
२) ओल्या नारळाचे तळणीचे मोदक
३) गौरी फराळ
(अनारसे, करंजी, चकली, चिरोटे). नोंदणी आवश्यक
मदर्स किचन
फुलवाला चौक धुळे.
9049902201
7887750864

पाहिजेत
अनुभवी सेल्समन पाहिजेत पगार अनुभवाप्रमाणे देण्यात येईल.
-: संपर्क :-
साईबाबा रेडिमेड & होजीअरी
अकबर चौक, गल्ली नं.२, धुळे
9422286958

पाहिजेत
Coputer Oprutor पाहिजे
(Tally आवश्यक)
Part Time/Full Time
Ladies /Gents
संपर्क:- आकाशदीप साडी एम्पोरियम
जे.बी.रोड, धुळे, फोन – 233230

पाहिजेत
होलसेल मेडिकलमध्ये कामासाठी मुले पाहिजेत
१) सेल्समन आणि कलेक्शन्स बाहेर गावी
२) दुकान काम हेल्पर
अनुभव असल्यास प्राधान्य
-:संपर्क :-
8888096777

गरम पाण्याचा एकच उपाय...
BAJAJ Crompton Racold USHA




आजच खरेदी करा आणि मिळवा पाईप सोबत फिटिंग फ्री *...
59 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

पाहिजेत
मसाले पॅकींग कामाकरीता होतकरु मुली/महिला पाहिजेत
-:संपर्क :-
9850162076

पाहिजेत
अनुभवी व हुषार सेल्समन पाहिजे– जागा ५
Coputer Oprutor
Full Time /Part Time
Ladies /Gents
संपर्क:- आकाशदीप साडी एम्पोरियम
जे.बी.रोड, धुळे, फोन – 233230

REQUIRED
Required: Hospital Administrative Officer (Male/Female)
For a 50-bedded Hospital at Dhule.
Experience in Hospital Administration.
Degree/Diploma in Health Care Management. Preference to Doctor- BAMS/BHMS/BUMS/BEMS/DHMS/BDS candidates.
Contact: 9422961803

पाहिजेत
धुळे, शिंदखेडा, शिरपूर, दोंडाईचा, साक्री, पिंपळनेर येथे कंपनीचा कामासाठी मुले-मुली पाहिजे आकर्षक पगार व कमिशन.
संपर्क
7387894755

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०